# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 19/04/2023 (बुधवार) सायंकाळ

---

### रेती चोरी करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. भिवापूर :— अंतर्गत ०.३ किमी अंतरावर भिवापूर येथे दिनांक १८/४/२०२३ चे ०२/३५ वा. पर्यंत पोलीस स्टेशन भिवापूर येथील स्टाफ हे पोलीस स्टेशन भिवापूर हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना खास मुकबिरव्दारे माहिती मिळाली की, एक अवैधरीत्या विनापरवाना टिप्परमध्ये रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीवरून भिवापूर पोलीस स्टाफ यांनी नाकाबंदी दरम्यान निलज कडुन नागपुर कडे जाणारा टिप्पर ट्रक क्र. एम. एच.— ३६/ए.ए— ११११२ चा चालक **आरोपी नामे— गिरीधर भद्रीनाथ कुंभरे वय ३६ वर्ष रा हनुमान मंदीर जवळ खापा त जि भंडारा** त्यास थांबवुन चेक केले असता सदर टिप्पर मध्ये रेतीचा लोड भरलेला दिसल्याने सदर चालकास रॉयल्टी बाबत विचारले असता चालकाने रेतीची रॉयल्टी नसल्याचे सांगितले सदर टिप्परमध्ये ६ ब्रॉस रेती किंमती अंदाजे ५०००/— रू. ब्रास प्रमाणे एकुण ३०,०००/— रू ची रेती तसेच टिप्पर ट्रक क्र. एम एच.—३६ एए —१११२ किंमती अंदाजे २०,००,०००/— रू असा एकुण २०,३०,०००/—रूपयाचा मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातुन जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे— किशोर रतपालसिंह ठाकुर, वय ४९ वर्ष पोलीस स्टेशन भिवापुर यांचे रीपोर्टवरून पोलीस स्टेशन भिवापूर येथे आरोपीविरूद्ध कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला असुन आरोपीस अटक करण्यात आलेली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा/९२४ प्रविन जाधव मो. नं. ९६८९९२५९२४ हे करीत आहे.


GOODS
आस्वी
TATA
MH·36·AA·1112

## गैरकायदयाची मंडळी

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत ०२ कि.मी अंतरावरील निसर्ग बार ॲन्ड रेस्टारेन्ट सावनेर येथे दिनांक १७/४/२०२३ चे १७/३५ ते १९/०० वा. दरम्यान यातील आरोपी नामे– **1) अशिष निळे, रा. खापा ता. सावनेर २) निलेश निळे व ईतर १० ते १५ लोक रा. खापा ता. सावनेर** यांनी संगनमतानी गैरकायदयाची मंडळी तयार करून फिर्यादी नामे– देवेन्द्र नारायण बभुरे, वय ४४ वर्ष, रा. पहलेपार सावनेर याचे निसर्ग बार ॲन्ड रेस्टॉरन्ट मध्ये हातात मोटारीचा चौडा बेल्ट घेवुन प्रवेश करून आरोपी क्र. १ यास हॉटेल मध्ये का मारहाण केली असे म्हणुन गर्दी व दंगा करून हॉटेल मध्ये दारूच्या बॉटला व काचेचे ग्लास फेकुन मारून बारमधिल वॉशिंग मशिन इलेक्ट्रॉनीक मिटरचे पॅनल हॉटेलचे वरील दर्शनी भागावर गोटमार करून काचा फोडुन बार व रेस्टॉरन्टचे ५००००/–रूपयाचे नुकसान करून फिर्यादीला हातभुक्यांनी मारहाण करून शिवीगाळी करून पाहुन घेण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीतांविरुध्द कलम १४३, १४७, १४८, १४९, ३३६, ३२३, ५०४, ५०६, ४२७ भादंवि कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी दोनोडे मो. नं. ९१४६६२५५३२ हे करीत आहे.

## अवैधरीत्या धारदार व घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत खदान नं. ०३ कालीमाता मंदिरा जवळ शिवगीरी शाळेमागे पोस्टे कन्हान येथे दिनांक १६/०४/२०२३ चे २२.०० वा. ते २२.४५ वा. दरम्यान पो.स्टे. कन्हान येथील स्टाफ हे कन्हान परिसरात पेट्रोलिंग करीत असतांना त्यांना मिळालेल्या माहितीच्या आधारे खदान नं ०३ कालीमाता मंदिरा जवळ शिवगीरी शाळेमागे राहणारा इसम **आरोपी नामे– राहुल लालाजी चौहान वय २३ वर्ष रा. खदान नं. ०३ कालीमाता मंदीर जवळ शिवगीरी शाळे मागे पोस्टे कन्हान** हा त्याचे जवळ लोखंडी तलवार बाळगुन घराजवळ बसलेला आहे. अशा मिळालेल्या माहिती वरून फिर्यादी आपल्या स्टाफसह जे. एन. हॉस्पीटल परिसरात जावुन दोन स्थानिक इसम नामे– १) अतुल मुलचंद राऊत, व २) सुशील सुरेश प्रजापती यांना फोनव्दारे बोलावुन त्यांना मिळालेली माहिती देवुन सदर इसमास ताब्यात घेतले.

सदर प्रकरणी सरकार तर्फे फिर्यादी नामे– पोहवा मुद्दसर जमाल ब. नं. ९७२ पोस्टे कन्हान यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ४, २५ आर्म ॲक्ट १३५ म. पो. अ. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा मुदसर जमाल मो. नं. ७०२००७४९७२ हे करीत आहेत.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर